प्रेस नोट, दिनांक :- १०/०८/२०१७

## सहकारनगर पो.स्टे. परिसरात दहशत पसरविणा-या अट्टल गुन्हेगाराची एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई

सहकारनगर पो. स्टे. हद्दीत राहणारा गुन्हेगार इसम नामे विशाल उर्फ डोक्या सुदाम साळुंके, वय-३० वर्षे, रा. बी २९/३, संभाजीनगर, धनकवडी, पुणे हा अभिलेखावरील सराईत गुन्हे करणारा गुन्हेगार आहे. नमुद इसमाने त्याचे साथीदारांसह सहकारनगर पोलीस ठाणे परिसरात कोयता, तलवार यासारखी जीवघेणी हत्यारे बाळगुन खंडणी मागणे, जबरी चोरी करणे, पळवून नेणे, दंगा करणे, सरकारी नोकरास त्याचे कर्तव्य करणेस अडथळा करणे या सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. नमुद गुन्हेगार इसमाची गुन्हेगारी कृत्ये सन-२००९ पासून चालू आहेत. नमूद इसमास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(ब) प्रमाणे दोन वर्षाकरीता पुणे शहर व लगतच्या जिल्हयातून हद्दपार करुनसुध्दा त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर काहीएक परिणाम होत नसलेचे दिसून आले होते. अशाप्रकारे नमुद गुन्हेगाराचे दहशतीमुळे सदर परीसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती तसेच नमुद इसमापासून जिवीताचे व मालमत्तेचे नुकसानीचे भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

श्री. रविंद्र कदम, पोलीस सह-आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.आपासाहेब वाघमळे, सहकारनगर पो.स्टे. यांनी एमपीडीए कायदयान्वये नमुद इसमास स्थानबध्द करण्याकामी प्रस्ताव तयार करुन मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचेकडे सादर केला. तद्नंतर **श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी प्रस्तावाची पडताळणी करुन नमुद इसमाचे विरुध्द दिनांक ०९/०८/२०१७ रोजी एक वर्षाकरीता स्थानबध्द आदेश पारीत केले आहेत.** त्यानुसार नमुद गुन्हेगार इसमास नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे स्थानबध्द करुन ठेवण्यात येत आहे.

गेले सात महिन्यात अशा गुन्हेगारी वृत्तीच्या बारा इसमांना एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्द केले आहे.